# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ब-क्षेत्रिय कार्यालय, एल्प्रो कंपनी परिसर, लिंक रोड, चिंचवडगांव, पुणे-३३.
(नागरी व प्रशासकीय सेवेसाठी आयएसओ 9001:2008 प्रमाणपत्र प्राप्त संस्था)
Email – bward@pcmcindia.gov.in Website – www.pcmcindia.gov.in
दुरध्वनी क्रमांक – ०२०-२७३५०१५३

जावक क्र.-बक्षे/सभाशाखा/२/कावि/ ९०३/२०१८ दिनाक २९/ ६ /२०१८

प्रति,
मा. श्री./श्रीमती-------------------------------------------,
प्रभाग क्र.---------------------------------------------,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.

विषय : ब प्रभाग समितीची मासिक सभा दि. ०३/०७/२०१८
रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दि. ०३/०७/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता ब क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली आहे. या पत्रासोबत सभेची कार्यपत्रिका पाठविण्यात येत आहे. तरी प्रस्तुत सभेस उपस्थित रहावे, हि विनंती कळावे,

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती

प्रत : सर्व संबंधित शाखा प्रमुख.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
ब प्रभाग समिती सभा
कार्यपत्रिका क्र. ४

दिनांक : ०३/०७/२०१८. वेळ : दुपारी १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक ०३/०७/२०१८. रोजी दुपारी १२.३० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित केली आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) मागील कार्यपत्रिका क्र. ३, दि. १२/६/२०१८ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणे

विषय क्रमांक १ मौजे किवळे, माळवालेनगर स.नं.७५/२ब/१ याठिकाणी १२.०० मीटर रस्त्याच्या पुर्वेला रोडपासून अंदाजे १०० मीटरवर ४० ते ५० कुटूंब राहत असून, काही स्थानिक मंडळींनी त्यांचा येणे जाण्यासाठी असलेला रस्ता बंद करुन सदर गरीब कुटूंबाना लॅण्ड लॉक केले असून, सदर कुटूंबासाठी सर्व्हे नं.७५/१अ मधून मुख्य रस्त्याला जोडण्यासाठी पुढील मिळकतीमधून १) कमाल गुलाब गाडे २) किसन बाळा तरस ३) लक्ष्मण तुकाराम तरस ४) जयवंत किसनराव नेटके यांच्या मिळकतीमधून कमीत कमी ६.०० मीटर रुंदीचा नियम २०५ नुसार रस्ता करुन दयावा व शेतक-यांना त्यांचा कायदेशीर योग्य तो मोबदला देऊन वरील प्रश्न सोडविण्याच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव.
(दिनांक १२/६/२०१८ रोजीच्या मा.प्रभाग समिती सभेमध्ये ठरल्याप्रमाणे)

विषय क्रमांक २ चिंचवड केशवनगर येथील आरक्षण क्रमांक २३३ मधील मोकळी जागा शेतकरी आठवडे बाजारासाठी कृषी पणन मंडळास भाडेतत्वावर देणेबाबत विचार करणे मा.क्षेत्रीय अधिकारी यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३ मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने येणारे ऐनवेळचे विषय.

29/6/18
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती

क्र.-बक्षे/सभाशाखा/२/कावि/903/२०१८
दिनाक -29/6/२०१८